प्रेस नोट. दिनांक : – १३/०१/२०१८

**पुणे हावडा आझादहिंद एक्सप्रेस गाडीमध्ये जबरी चोरी करणाऱ्यांना २४ तासाचे आत जेरबंद, स्थानिक गुन्हे शाखा, लोहमार्ग पुणे पथकाकडून कामगिरी.**

दि. ११/०१/२०१८ रोजी २०:२५ ते २२.०० वा. दरम्यान केडगांव रेल्वे स्टेशन येथे प्लॅटफॉर्म नं. १ वर गाडी नं. १२१२९ पुणे – हावडा आझाद हिंद एक्स. गाडी थांबली असता गाडीचे इंजिनचे पाठीमागील पुणे कडील जनरल बोगीत चोर चोर असा आवाज फिर्यादी नामे अविनाश एकनाथ पवार वय ५० रा. फुरसुंगी पुणे आरपीएफ हवालदार (पेट्रोलींग कर्तव्यावरील) यांना आल्याने ते नमुद ठिकाणी गेले असता तेथे स्वतःच्या आर्थिक लाभाकरीता प्रवाशांना मारहाण करून जबरदस्तीने खिशातील पैसे काढुन घेवून पळून जात असताना फिर्यादी व त्यांचे साथीदारांनी आरोपी नामे सुनिल श्रीपती जाधव वय ३७ वर्ष रा. केडगांव, ता. दौंड, जि. पुणे यास रंगेहाथ पकडले व त्याचे दोन साथीदार अंधाराचा फायदा घेवून पळून गेले. सदर बाबत पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल झाला व गुन्हयाचे कार्यक्षेत्र दौंड लोहमार्ग पोलीस ठाणेची असल्याने तेथे गु.र.नं. ०६/२०१८ भादवि कलम ३९२, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला सदर गुन्हयात एकुण १८००/– रोख रक्कम चोरीस गेली. गुन्हयाची गंभीरता पाहून सदर गुन्हयाचा पुढील तपास गुन्हे शाखा, लोहमार्ग पुणे कडे देण्यात आला.

स्थानिक गुन्हे शाखेकडील पोलीस अधिकारी व कर्मचारी हे तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळी केडगांव येथे गेले व अटक आरोपी याचेकडे सखोल तपास करून आरोपीने दिलेल्या वर्णनावरून दि. १३/०१/२०१८ रोजी आरोपी नामे १) विजय बापुराव सोडनवर वय ३२ वर्ष २) सचिन संजय थोरात वय २० वर्ष दोघे रा.मु.पो.बोरी पारधी, केडगांव, ता. दौंड जि. पुणे यांना त्यांचे राहते घरी सापळा रचून अत्यंत शिताफीने त्यांना ताब्यात घेतले. नमुद गुन्हयातील मुददेमाल हस्तगत करून २४ तासाचे आत गुन्हा उघडकीस आणला.

सदरची कामगिरी मा.पोलीस अधीक्षक डॉ. प्रभाकर बुधवंत, मा.अपर पोलीस अधीक्षक श्री. तुषार पाटील यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अनिल दबडे स्थानिक गुन्हे शाखा, लोहमार्ग पुणे, पोलीस उप निरीक्षक विष्णु गोसावी, पोलीस हवालदार प्रशांत डोईफोडे, धनजय दुगाने, पोलीस नाईक गजानन केंगार, पोलीस शिपाई ज्ञानेश्वर सुर्यवंशी, दिनेश बोरनारे, राजेश कोकाटे या पथकाने केली.